ROTARY CLUB OF KOLHAPUR

RI District 3170 | Club No. : 15655 | Charter No. : 5685 | Charter Date. : 01-11-1943

# ROTARY HERALD

WEEKLY BULLETIN 2026-27

DATE : 23 September 2026

## SEPTEMBER : BASIC EDUCATION AND LITERACY

### Weekly Meeting Report: Wednesday, 16th September 2026




या मिटिंगचे आजचे वक्ते होते सामाजिक कार्यकर्ते श्री. आशिष कोंगळेकर व मिटिंगचा विषय होता पर्यावरण पूरक गणेशोत्सव! त्यांची ओळख रो. संजीव चिपळूणकर यांनी करून दिली. ते स्वतः सराफ व्यावसायिक असले तरी सामाजिक कार्यात त्यांचा मोठा सहभाग आहे. कोल्हापूर अर्थ वॉरियर्स या संस्थेचे ते सभासद आहेत.

त्यांनी या विषयावर बोलताना सांगितले की प्लास्टर ऑफ पॅरिस ची मूर्ती पाण्यात विरघळत नाही तर शाडू मातीची मूर्ती ही माती खूप चिकट असल्याने बऱ्याच वेळा विहिरी किंवा तळ्यातील जिवंत झरे मुजवून टाकते त्यामुळे ते बंद होऊ शकतात. त्यामुळे पर्यावरण पूरक मूर्ती करावयाची तर नेहमीच्या मातीची ती असावी व ती घरीच विसर्जन करून त्या माती द्वारे एक कुंडी बनवून त्यात सुंदर रोप लावल्यास त्यावर्षाची कायमस्वरूपी आठवण राहू शकते. तसेच देवाचे निर्माल्य हे पाण्यात विसर्जन करण्याऐवजी ओल्या कचऱ्याचे कंपोस्ट खत तयार करून त्यामध्ये त्याचे विसर्जन करावे त्यामुळे पर्यावरण जागृती होईल. शेवटी आभार प्रदर्शन रो. सिद्धार्थ पाटणकर यांनी केले.

******

Driving **Innovation** and **Growth** for **Better Future**

**RTN. DR. LENNY DA COSTA**
DISTRICT GOVERNOR 2026-27

**RTN. OLAYINKA BABALOLA**
R I PRESIDENT 2026-27

**RTN. HARSHAD DHALE**
CLUB SECRETARY 2026-27
rtn.harshad3170@gmail.com

**RTN. PRADEEP PASMAL**
CLUB PRESIDENT 2026-27
rtn.pradeep3170@gmail.com

**RTN. NILESH KUTTE**
JT. BULLETIN EDITOR
nilesh.kutte@gmail.com

**RTN. SANJEEV CHIPLUNKAR**
BULLETIN EDITOR
kalakalpana.advt@gmail.com

Bulletin Issue No: 12

0231-2651444
www.rotarykolhapur.org
Instagram : rotarykolhapur


MAIA
ESTATES
Bengaluru
Presents
Rotary
District 3170
Raas
Dandiya
2026
Organized by
Rotary Club of Kolhapur
Save The Date
13 / 10 / 2026 Tuesday, 6 pm onwards
Venue: Ramkrishna Lawn, Market Yard, Kolhapur
Rtn. Pradeep Pasmal
President
Rtn. Harshad Dhale
Secretary
Rtn. Amish Shah
Event Chair
Rtn. Laxminivas Biyani
Event Co- Chair
Rtn. Dhaval Gala
Public Image Chair
Rtn. Sharad Totla
Club Service Director
For more details contact : 8010723072
The beats are calling...


Rotary
CREATE LASTING IMPACT
रोटरी क्लब ऑफ कोल्हापूर
आयोजित
पर्यावरणपूरक गणपती आरास स्पर्धा
2026
विभाग 1 : सर्वोत्कृष्ट सजावट
विभाग 2 : सर्वोत्कृष्ट सामाजिक संदेश
विभाग 3 : सर्वोत्कृष्ट गणेश मूर्ती
प्रत्येक विभागात दोन आकर्षक बक्षिसे
स्पर्धेचे नियम:
1. रोटरी मूव्हमेंट ऑफ कोल्हापूर, इनरव्हील व रोटरॅक्ट कोल्हापूर अंतर्गत असलेल्या सर्व क्लबचे मेम्बर्स या स्पर्धेत सहभागी होऊ शकतील.
2. आरास करताना पर्यावरणपूरक व नाविन्यपूर्ण सजावट कल्पनांना प्राधान्य दिले जाईल.
3. गणेशमूर्ती शाडू माती किंवा नैसर्गिक मातीपासून बनविलेल्या मूर्तीस प्राधान्य.
4. सजावटीमध्ये थर्माकोल, प्लास्टिक किंवा प्लास्टर ऑफ पॅरिसचा वापर करू नये.
5. सजावटीसाठी कृत्रिम फुलांचा वापर नसावा. नैसर्गिक फुलांनाच प्राधान्य.
6. आरास करताना शक्यतो बहुतांश साहित्य नैसर्गिक व पर्यावरणपूरक असावे.
7. आरासमध्ये लाईट-शो किंवा लेझर-शोचा वापर करू नये.
8. स्पर्धेसाठी नोंदणी फोनद्वारे किंवा खाली दिलेल्या WhatsApp क्रमांकावर करावी.
9. जरुरी वाटल्यास परिक्षक घरी सजावट पाहण्यास येऊ शकतात.
10. नोंदणीची अंतिम तारीख : 22 सप्टेंबर 2026
11. परीक्षकांचा निर्णय अंतिम व सर्व स्पर्धकांना बंधनकारक राहील.
परिक्षक:
रो.डॉ.अभिजीत हावळ
इव्हेंट चेअर
ॲन प्राजक्ता चरणे
इव्हेंट को-चेअर
ॲन पूनम शहा
ॲन राखी धोडके
ॲन श्वेता गाला
मोफत प्रवेश
1) सजावटीचे तीन फोटोस, 2) एक फॅमिली फोटो,
3) फक्त 1 मिनिटाचा व्हिडीओ, 4) सामाजिक संदेश
रो.डॉ.अभिजीत हावळ 9371102880
ॲन प्राजक्ता चरणे 94224 28445
यांच्या WhatsApp नंबर वर 22 सप्टेंबर 2026 पर्यंत पाठवावेत.
रो. प्रदीप पासमल
प्रेसिडेंट
रो. हर्षद ढाले
सेक्रेटरी
रो. शरद तोतला
क्लब सर्व्हिस डायरेक्टर

# रोटरी क्लब ऑफ कोल्हापूर आयोजित
# 'कॉम्प्युटर डोनेशन' प्रोजेक्ट उत्साहात संपन्न






रोटरी क्लब ऑफ कोल्हापूर आयोजित कॉम्प्युटर डोनेशन प्रोजेक्ट अगदी उत्साहवर्धक वातावरणात पार पडला. बेटर एज्युकेशन, ब्राईटर फ्युचरचा संदेश देऊन हा कार्यक्रम सन्मित्र हौसिंग सोसायटी, राजारामपुरी १४वी गल्ली, येथील **आर.के. वालावलकर प्रशाला** येथे झाला. या कार्यक्रमास रो.प्रदीप पासमल, रो.जयेश गांधी, रो.प्रसाद डबीर, रो.शिवाजी बेनाडीकर इ. उपस्थित होते.



---

**तुमच्या विचारांतून तुमचं व्यक्तिमत्व झळकत असतं**
**त्याकडे तुमचं नसलं तरी इतरांचं लक्ष असतं**
**तुमचे विचार समजले की तुम्ही समजलात !**
**सुंदर विचार करा आणि सुंदर व्यक्तिमत्व घडवा.**

***************

**पावसातून जेवढा ओलावा मिळत नाही,**
**तेवढा जिव्हाळा मैत्रीत मिळतो....**
**मैत्रीमधल्या सावलीचा अर्थ**
**कधीतरी उन्हातून गेल्यावर कळतो...**

## HAPPY BIRTHDAY

| | |
|---|---|
| Rtn. Jayesh Gandhi | 22 Sept. |
| Rtn. Rishikesh Patil | 22 Sept. |
| Rtn. Shyamsundar Totla | 24 Sept. |

## Next Meeting :

विषय:
**रोटरी समाजसेवा केंद्र**
**वार्षिक सर्वसाधारण सभा**
स्थळ: माधवप्रसाद गोएंका भवन,रोटरी समाजसेवा केंद्र
दि. २३ सप्टेंबर २०२६ सायं.५.३० वा.

ROTARY CLUB OF KOLHAPUR'S
**ROTARY SAMAJ SEVA KENDRA**
Shri Madhavprasad Goenka Bhavan, Nagala Park, Collector Office Road, Kolhapur - 416003
0231-2651444 / 8421680596
rsskkop@gmail.com
https://rssk.org

ESTD. : 4th April, 1969 | P.T. Registration No. E-679, Kolhapur | Exemption U/S 80-G of the Income Tax Act. 1961

### वार्षिक सर्वसाधारण सभा

*नोटीस*

रोटरी समाज सेवा केंद्राची ५७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा बुधवार दि. २३ सप्टेंबर २०२६ रोजी सायं ५.३० वाजता रोटरी समाजसेवा केंद्र माधव प्रसाद गोयंका भवन, श्रीमती कमल गोविंद गुंदेशा हॉल मध्ये खालील कामांचा विचार करणेसाठी भरणार आहे.

*सभेपुढील विषय*

१ . मागील सभेचे प्रोसिडिंग वाचून कायम करणे.
२ . संस्थेचा सन २०२५-२०२६ चा अहवाल सादर करणे.
३ . संस्थेचे दिनांक ३१/०३/२०२६ अखेरचे ताळेबंद व जमा खर्च पत्रक मंजूर करणे.
४ . सन २०२६ -२०२७ सालाचे सुधारित अंदाजपत्रक मंजूर करणे.
५ . सन २०२६ -२०२७ सालासाठी ऑडिटर यांची नेमणूक करणे व त्यांची फी ठरवणे.
६. मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या कामांचा विचार करणे.

येणेप्रमाणे सभेत कामकाज होणार असल्याने सदर सभेस सर्वांनी अगत्यपूर्वक वेळेवर हजर राहून सहकार्य करावे ही नम्र विनंती.
कळावे,

दिनाक : ०९/०९/२०२६

संचालक मंडळाच्या आदेशावरून
रो. अरविंद कृष्णन
सेक्रेटरी, रोटरी समाज सेवा केंद्र,कोल्हापूर

१. कोरम अभावी सभा तहकूब झाल्यास सदर सभा त्याच दिवशी अर्ध्या तासानंतर त्याच ठिकाणी सभेच्या पुढील विषयांचा विचार करण्यासाठी घेण्यात येईल व त्या सभेस कोरमची आवश्यकता असणार नाही.
२. अहवाल ताळेबंद व जमा खर्च पत्रक यासंबंधी माहिती पाहिजे असल्यास ती RSSK ऑफिसमध्ये, ऑफिस वेळेत पाहायला मिळू शकेल.
३. ताळेबंद व जमा खर्च पत्रकाबाबत काही सूचना प्रश्न मांडावयाचे असल्यास ते सोमवार दिनांक २१/०९/२०२६ इ. अखेर ऑफिस वेळेत प्रेसिडेंट अथवा सेक्रेटरी यांचेकडे लेखी द्यावेत.



## आपण यांना ओळखलेत का?

आपल्या क्लबचे ॲक्टीव्ह मेंबर
ओळखलंत तर फोन करा सत्वर.
फोन **9822421262**
बरोबर सभासदांची नांवे आम्ही
पुढील बुलेटीनमध्ये प्रसिध्द करू.
त्याबरोबर इतरांना त्यांची ओळखही करून देऊ.

**रोटरॅक्ट व रोटरी क्लब ऑफ कोल्हापूरचे माजी अध्यक्ष रो.संजीव चिपळूणकर**
१९८१ पासून रोटरॅक्ट क्लबमध्ये सभासद, १९८३-८४ मध्ये रोटरॅक्ट क्लब प्रेसिडेंट तर १९८६-८७ मध्ये DRR पद भूषविले. १९९१ पासून रोटरी क्लब ऑफ कोल्हापूरमध्ये सभासद तर २००३-०४ मध्ये क्लब सेक्रेटरी व २००६-०७ मध्ये क्लब प्रेसिडेंट पद भूषविले. **रोटरी प्रेसिडेंट पदाच्या कार्यकाळात डिस्ट्रीक्ट सिंगल बेस्ट प्रेसिडेंट व बेस्ट क्लबची कायमस्वरूपी ट्रॉफी मिळवून क्लबला डिस्ट्रीक्टमध्ये मानाचे स्थान मिळवून दिले.**





## आपण यांना बरोबर ओळखलेत....

रो.कुशल राठोड
रो.भूषण राठोड
रो. अजिंक्य कदम

## THE 4-WAY TEST:

**Of the things we think, say or do,**
Is it the **Truth**? Is it **FAIR** to all concerned?
Will it build **GOODWILL** & **BETTER FRIENDSHIPS**?
Will it be **BENEFICIAL** to all concerned?

We meet every **WEDNESDAY 5:30PM** at
**ROTARY SAMAJ SEVA KENDRA**
Madhavprasad Goenka Bhavan, Collector Office Road,
Nagala Park, Kolhapur 416 003